International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 Sept – Oct 2022

मुंबई विद्यापीठ सलग्न रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथपालांचे कार्य समाधान

(Job Satisfaction)

श्री. कमलाकर मधुकर सावंत
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , लांजा

DOI- 10.5281/zenodo.10162596

प्रस्तावना (Introduction) :

कार्यसमाधन हि एक अभिवृत्ती असून आपल्या कामाबद्दल कर्मचाऱ्याला वापल्या कामाबद्दल काय वाटते हे त्यातून दिसून येते. म्हणजेच त्याच्या कामातून त्याच्या मनात कोणता भाव निर्माण होतो त्यावरून त्याची त्याच्या कामाबद्दलची अभिवृत्ती प्रतिकूल आहे किवा अनुकूल आहे हे त्यतून व्यक्त होते. कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना आनंदी कर्माग्री तोच असतो जो त्यात समाधानी आहे . कार्य समाधान हे अत्यंत महत्वाचे आहे कारण बरेचसे कर्मचारी हे आपल्या जीवनातील सर्वात मोठा काळ हा त्याच्या कामाच्या जागेतच घालवत असतो . कार्यासामाधन हि एक अभिवृत्ती असून आपल्या कामाबद्दल आपल्याला काय वाटते हे त्यातून दिसून येते . म्हणजेच त्यांच्या कामातून त्यांच्या मनात कोणता भाव निर्माण होतो त्यावरून त्यांच्या कामाबद्दलची अबिवृत्ती प्रतिकूल आहे किवा अनुकूल आहे हे त्यातून व्यक्त होते .

आपण करत असलेल्या कामाच्या मोबदल्यात कर्मचाऱ्याला काही अपेक्षा असतात आणि काहि जणांना स्वतंत्र जबाबदारी असते . काही जणांना व्यक्तिगत प्रगतीची संधी उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा असते. या सर्वमधून त्याची अपेक्षा किती पूर्ण होते यावरून त्यांच्या कार्यासामाधनाची पातळी लक्षात येते. तसेच त्यांची पातळी कमी होऊ नये यासाठी व्यवस्थापना कडून प्रयत्न केले जाणे गरजेचे आहे.

हकमान व ओल्ड हम यांच्या मतानुसार, ज्या पदावर एखादा कर्माची काम करीत असतो ते जर अस्थायी (Temporary) स्वरूपाचे असेल तर त्याला त्या कामावरून कधी काढून टाकण्यात येईल याचा नेम नसतो. त्यामुळे अशा असुरक्षिततेच्या तणावाखाली तो काम करत असतो व त्यामुळे साहजिकच तो असमाधानी असतो . परंतु अशा कर्म चाऱ्याची आपल्याला कायम दर्जा प्राप्त व्हावा अशी अपेक्षा असते . व त्यातून त्यांना कार्य सुरक्षा समाधान मिळत असते. तसेच कामाच्या मोबदल्यात मिळत असलेले वेतन तसेच वेतनाव्यतिरिक्त बोनस वेतनवाढ किवा अन्य आर्थिक सवलतींमुळे आर्थिक समाधान मिळत असते. कर्मचारी ज्या सहकार्यांबरोबर काम करतो त्यांच्याकडून म्लणारा सहकार्य , स्नेह या गोष्टीवर हि समाधान अवलंबून असते व त्यातून कर्मचारी ह्यांची मानसिक स्वस्थ निकोप राहण्यास मदत होते. वाढत्या कार्यानुभावातून स्वताचा विकास करून घेण्याची गरज बळावते व नवीन कौशल्ये संपादन करणे, स्वतंत्र जबाबदारी स्वीकारणे , संपादित केलेल्या कौशल्यांचा वापर करणे यासाठी योग्य टी संधी प्राप्त व्हावी असे कर्मचाऱ्याना मनोमन वाटत असते व तशी संधी मिळाली तर त्याचे समाधान वाढण्यास मदत होते.

गरज व राष्ट्रीय महत्व (Origin of the Research & National Importance)

महाविद्यालयीन ग्रंथपाल हा असाच एक कर्मचारी असतो जो उच्चाशिक्षानाच्या क्षेत्रात महत्वाची भूमिका निभावत असतो . विद्यार्थी शिक्षक व इतर संशोधक यांच्या गरजा उत्तरोत्तर वाढत आहेत . आणि या वाढत्या गरजा पूर्ण करण्याचे काम ग्रंथपालाकडून केले जात असते . त्यांच्या कामातील समाधान त्यांना तेव्हाच मिळेल जेव्हा ग्रंथालयाची कामे सुरळीत पाने चालत असतील कारण मनशांती शिवाय कोणत्याही कामातील अपेक्षित यश मिळणे कठीण आहे. ग्रंठ्पालाना मिळणारे समाधान हे त्यांच्या कामाचा सामाजिक दर्जा , कामातून मिळणारे वेतन , कामाचे तास,ग्रंथालयातील कर्मचारी , निवृत्ती वेतन, मिळणाऱ्या सुविधा , ग्रंथालयातील काम करतानाचे सभोवतालचे वातावरण , त्याचप्रमाणे वरिष्ठ व कनिष्ठ सहकारी यांच्याशी असलेले संबंध यावरून त्याच्या कामातून त्यांना कार्यासामाधन मिळते का ? ह्या व इतर प्रश्नाची उत्तरे शोधता येतील व त्यासाठी काही उपाययोजना आहेत का हे बघणे सोपे होईल. केंद्र सरकार व राज्यसरकारची उच्च शिक्षणाची धोरणे हि नेहमी बदलत आहेत . अनुदान कपात करण्याचे धोरण सरकारने अंगिकारले आहे.

सर्व प्रकारची महावि द्यालये जसे कि अनुदानित व विनानुदानित स्वरुपाची कशी चालवली जातात व तेथील ग्रंथालयांचे व्यवस्थापन कशा स्वरूपाचे असते कर्मचारयांच्या नेमणुका तसेच त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा कशा आहेत हे पाहणे योग्य ठरेल .अनुदानित महाविद्यालायापेक्षा विना अनुदानित महाविद्यालयाचे प्रश्न अतिशय बिकट आहेत.

मुंबई विद्यापीठांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील काही महाविद्यालये हि आर्थिक दृष्ट्या सक्षम नाहीत. आज रत्नागिरी जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठांतर्गत असलेली सर्वच महाविद्यालये अनुदानित स्वरुपाची नाहीत . तर बहिचाशी विनानुदानित तत्वावर चालविली जात असून इतर आर्थिक स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे खूप कष्टाने व काटकसरीने चालविली जातात. रत्नागिरी

सारख्या ग्रामीण भागातील ग्रंथापालाना मिळत असलेल्या सुविधांमध्ये बरीच तफावत आहे अशा महाविद्यालयांना ग्रंथालयावर खर्च करणे शक्य होत नाही. अशावेळी तेथे ग्रंथपाल नेमणूक व त्याच्या वेतनाचे प्रश्न निर्माण झालेले दिसतात. अशावेळी ग्रंथपाल करत असलेल्या कामातील त्यांच्या कार्यसमाधानाची पातळी काय आहे या सर्वचा चिकित्सक अभ्यास येथे करण्यात आला आहे.

उद्धीष्ट्ये (Objectives of the Research) :

1. महाविद्यालयीन ग्रंथपालांचा व्यवसायाबद्दलचा दृष्टीकोन जाणून घेणे.
2. महाविद्यालयीन ग्रंथपालांचे त्यांच्या कामातील समाधानाचा अभ्यास करणे.
3. महाविद्यालयीन ग्रंथपालाच्या कामाचे स्वरूप जाणून घेणे .
4. महाविद्यालयीन ग्रंथपालाचे वेतन , पदोन्नती इत्यादी संदर्भात अभ्यास करणे.
5. महाविद्यालयीन ग्रंथपालाचे व्यवस्थापन व सहकर्मचारी यांच्यातील संबधांचा अभ्यास करणे
6. महाविद्यालयीन ग्रंथपालांचे सर्यासामाधन वाढावे यासाठी उपाय योजना सुचविणे.

व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitation of Research) :

सदर संशोधनात रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाचा अभ्यास केला आहे . रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १३ अनुदानित व २६ विना अनुदानित महाविद्यालये आहेत . या सर्व महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये असणाऱ्या ग्रंथपालांच्या कार्याचा तसेच कार्यासामाधनाचा अभ्यास येथे करण्यात येणार आहे . सदर संशोधनासाठी सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथापालांची माहिती संकलित करण्यात आली आहे.

संशोधन पद्धती व माहिती संकलन (Research Methodology & Data Collection) :

मुंबई विद्यापीठ सलग्न रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथपालांचे कार्यसमाधान (Job Satisfaction) हा अभ्यास करण्यासाठी संबधित सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथापालांची माहिती मिळवून वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक संशोधनपद्धतीचा वापर करण्यात येणार आहे . तसेच माहिती मिळविण्यासाठी सर्व महाविद्यालयांना प्रश्नावली वितरीत करून माहिती मिळविण्यात आली.

कार्यसमाधान संकल्पना :

कार्यसमाधान म्हणजे कामगारांचा कामाबद्दल असणारा दृष्टीकोन काय आहे तो समजून घेणे. आपल्याला कामातून काय व किती प्रमाणात सध्या होते यावर आधारित त्यांचा दृष्टीकोन असतो . कार्य समाधान म्हणजे कार्य परिस्थिती विषयी व्यक्तीची अनुकूल भावना किवा अनुकूल मानसिक अवस्था होय. कार्य करणारया व्यक्तीचा कार्याकडे बघण्याचा दृष्टीकोन म्हणजे कार्य समाधान . एखादे कार्य करण्यासाठी आवश्यक असणारे शारीरिक आणि मानसिक श्रम व त्याचा मिळणारा मोबदला आणि काम करणाऱ्या व्यक्तीच्या गरजा व अपेक्षा यांचा सुंदर मिलाप किवा संगम म्हणजे कार्य समाधान होय .कार्य समाधानाचा संकुचित अर्थ घेतला तर हीअभिवृत्ती व्यवसायाशी आणि त्यांच्याशी निगडीत काही घटकांशी संबधित आहे कि ज्यामध्ये विशेषतः पर्यवेक्षण, कर्मचाऱ्यांची स्थिरता, कामाच्या ठिकाणची स्थिती, कामाच्या ठिकाणची संधी, बढती, कामाचे मुल्यांकन, व्यवसायाच्या ठिकाणातील असलेले संबध इतरांकडून मिळणारी वागणूक आणि इतरांशी समायोजन. जर व्यापक दृस्तीकोनातून विचार केला तर त्यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्याचे वाय, आरोग्य , सहनशीलता इच्छा आणि महत्वाकांक्षा याच बरोबर कौटुंबिक संबध, सामाजिक प्रतिष्ठा संस्थेतील स्थान इ . सर्व घटकांचा कार्य समाधानाशी संबंध आहे.

कार्यसमाधान निर्माण होण्यासाठी खालील परिस्थिती असणे आवश्यक आहे .

1. कर्म चाऱ्याच्या सर्व समस्या सहनशीलतेने एकून त्या सोडविल्या पाहिजेत.
2. कर्मचाऱ्याची योग्य वेळेवर बढती व वेतन वाढीबाबत नियमावली असली पाहिजे.
3. व्यवस्थापन जेव्हा कर्मचाऱ्याच्या क्षमताकडे व प्रगतीकडे लक्ष देते तेव्हा कर्मचाऱ्याचे कार्यासामाधन उच्च राहते.
4. व्यवस्थापकांनी व पर्यवेक्षकांनी कर्मचाऱ्यांच्या चुका मैत्रीच्या संबधातून दाखवून द्याव्या.
5. कर्मचाऱ्याला समाधान वाटले तर कामाची गुणवत्ता राखता येते.
6. कर्मचाऱ्याला उगाच त्रास दिला तर तोअसमाधानी राहतो .

माहिती विश्लेषण व सादरीकरण :

माहिती संकलनासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील ९ तालुक्यातील २८ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेट दिली व त्यातील माहिती संकलित केली.

महविद्यालयीन ग्रंथपालांच्या कार्य समाधानाचा अभ्यास करताना प्रत्येक महाविद्यालयातील ग्रंथापालाना प्रश्नावली वितरीत करण्यात आली होती . कला , वाणिज्य व विज्ञान विभागातील २८ महाविद्यालायापैकी २४ महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला त्या आधारे प्रश्नावलीचे तक्तेव आलेख याद्वारे विश्लेषण केले आहे .

1. महाविद्यालयाचे नाव :

अ.क्र.	सांकेतिक चिन्ह	महाविद्यालयाचे नाव
1	A	डी.बी.जे. महाविद्यालय ,चिपळूण
2	B	गोगटे जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी
3	C	आठले ,सप्रे पित्रे महाविद्यालय, देवरुख

4	D	कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , लांजा
5	E	आय .सी.एस. महाविद्यालय खेड
6	F	मनोहर हरी खापणे महाविद्यालय, पाचल
7	G	डॉतात्यासाहेब नातू महाविद्यालय , मार्गताम्हाने
8	H	कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , पट पन्हाळे
9	I	मंडणगड महाविद्यालय मंडणगड
10	J	वराडकर बेलोसे महाविद्यालय दापोली
11	K	युवक विकास मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजापूर
12	L	कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय साखरपा
13	M	नवनिर्माण महाविद्यालय संगमेश्वर
14	N	भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , रत्नागिरी
15	O	मोहिनी मुरारी मयेकर महाविद्यालय , चाफे
16	P	कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , सावर्डे
17	Q	डॉ तानाजीराव चोरगे महाविद्यालय ,चिपळूण
18	R	सौ शैलजा शिंदे आर्टस कॉमर्स कॉलेज पेढांबे
19	S	तू .बा. कदम कला वाणिज्य व विज्ञान महा विद्यालय , खेड
20	T	,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , मोरवांडे
21	U	नवनिर्माण महाविद्यालय , रत्नागिरी
22	V	डी. जे. सामंत महाविद्यालय पाली
23	W	वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , शिवारे आंबेरे
24	X	लोकनेते शामराव जी पेजे महाविद्यालय

2.महाविद्यालयाचे स्वरूप

अ.क्र.	स्वरूप	महाविद्यालयाची संख्या	टक्केवारी
1	ग्रांट	14	58.33
2.	नॉन ग्रांट	10	41.67

या मधील आकडेवारी नुसार रत्नागिरी जिल्ह्यातील १० महाविद्यालये प्रायवेट एडेड आहेत व उर्वरित १४ महाविद्यालये अन एडेड आहेत .

3.ग्रंथपालांची शैक्षणिक पात्रता :

सांकेतांक	शैक्षणिक पात्रता	**वेतनश्रेणी**	**हंगामी /कायम**
A	M.A.Mlib SET	15600-39100	कायम
B	MA, B.Ed., Mlib.&I.Sc., NET, SET, M.Phil., Ph.D	15600-39100	कायम
C	Mlib Set net set	15600-39100	कायम
D	M. Lib., M. Phil., SET	15600-39100	कायम
E	M. A., M. Lib., M. Phil., SET	15600-39100	कायम
F	M.Lib. M.Phil.	15600-39100	कायम
G	M. Lib., M. Phil., SET	15600-39100	कायम
H	M.A.Mlib SET	15600-39100	कायम
I	MA, B.Ed., Mlib.&I.Sc., NET, SET, M.Phil., Ph.D	15600-39100	कायम
J	Mlib Set NET	15600-39100	कायम
K	M.Lib.	3000	हंगामी
L	M.Lib.	3000	हंगामी
M	M.Lib.	12000	हंगामी
N	M.Lib.	10000	हंगामी
O	M.Lib.	5000	हंगामी

P	M.Lib.	8000	हंगामी
Q	M.Lib.	8000	हंगामी
R	M.Lib.	8000	हंगामी
S	M.Lib.	8000	हंगामी
T	M.Lib.	7000	हंगामी
U	M.Lib.	12000	हंगामी
V	M.Lib.	8500	हंगामी
W	M.Lib.	5000	हंगामी
X	M.Lib.	3000	हंगामी

४.ग्रंथपालांचे एकूण झालेल्या सेवेप्रमाणे विभागणी

अ.क्र.	सेवेतील वर्ष	एकूण	टक्केवारी
1	१ वर्ष ते ५ वर्ष	6	25
2	६ वर्ष ते १० वर्ष	13	54
3	११ वर्ष ते १५ वर्ष	1	4
4	१५ वर्ष ते २० वर्ष	1	4
5	२० वर्ष पेक्षा जास्त	3	13



५.कुटुंबाचे स्वरूप

अ.क्र.	**कुटुंबाचे स्वरूप**	एकूण	टक्केवारी
1	एकत्रित	17	71
2	विभक्त	07	29



६.ग्रंथपालांच्या वेतनश्रेणी प्रमाणे वर्गवारी -

अ.क्र.	**वेतन**	एकूण	टक्केवारी
1.	1000ते 3000	0	41.67

2.	3000 ते8000	10	16.67
3.	8001 ते 12000	4	41.67
4.	75000 ते पुढे	10	10



७. पदासाठी मिळत असलेल्या वेतनावर समाधानी /असमाधानी वर्गवारी

अ.क्र.	**तपशील**	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	9	37.5
2.	समाधानी	11	45.83
3.	अव्यक्त	-	
4.	असमाधानी	-	
5.	अतिशय समाधानी	4	16.67



८.ग्रंथपाल पदासाठी मिळत असलेल्या सुट्ट्या बाबत समाधानाची वर्गवारी

अ.क्र.	**तपशील**	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	-	-
2.	समाधानी	4	16.66
3.	अव्यक्त	-	-
4.	असमाधानी	-	-
5.	अतिशय समाधानी	20	83.33

९. सेवासामाप्ती नंतर मिळत असलेल्या निवृत्ती वेतन व इतर सोयी

अ.क्र.	**तपशील**	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	-	-
2.	समाधानी	4	17 %
3.	अव्यक्त	-	-
4.	असमाधानी	-	-
5.	अतिशय समाधानी	20	83 %



१०. नोकरीतील सुरक्षितेच्या बाबतीतील समाधानाची वर्गवारी

अ.क्र.	**तपशील**	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	7	29.17
2.	समाधानी	11	45.83
3.	अव्यक्त	-	0.00
4.	असमाधानी	5	20.83
5.	अतिशय समाधानी	1	4.17



११ उपलब्ध असलेले कामाचे वातावरण

अ.क्र.	**तपशील**	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	7	29.17
2.	समाधानी	11	45.83
3.	अव्यक्त	-	0.00
4.	असमाधानी	5	20.83
5.	अतिशय समाधानी	1	4.17



१२. वरिष्ठांचे मिळत असलेले मार्गदर्शन

अ.क्र.	**तपशील**	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	2	8.33
2.	समाधानी	24	91.67
3.	अव्यक्त	-	
4.	असमाधानी	-	

5.	अतिशय समाधानी	-	



१३. वरिष्ठ तसेच व्यवस्थापनाशी असलेले संबध

अ.क्र.	तपशील	एकूण	टक्केवारी
1.	अतिशय समाधानी	5	20.83
2.	समाधानी	19	79.17
3.	अव्यक्त	-	
4.	असमाधानी	-	
5.	अतिशय समाधानी	-	



१४. ग्रंथालय व्यवसायात येण्याचे कारण

अ.क्र.	तपशील	एकूण	टक्केवारी
1.	आर्थिक परिस्थिती	6	29.17
2.	नोकरीचे स्वरूप	15	45.83
3.	भविष्यातील बढतीच्या संधी	3	0.00
4.	घरगुती कारण	0	20.83
5.	काहीच पर्याय नसल्याने	0	



१५.या व्यवसायातील शैक्षणिक पात्रता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणारे घटक

अ.क्र.	तपशील	एकूण	टक्केवारी
1.	वैयाक्तिक विकास	7	29.17
2.	बढती मिळण्यासाठी	7	29.17
3.	मोठा पगार	5	20.83
4.	आवड म्हणून	5	20.83



१६. कार्यक्षमता वाढविणारे घटक

अ.क्र.	तपशील	एकूण	टक्केवारी
1.	माहिती तंत्रज्ञान	11	45.83
2.	नोकरीतील स्थर्य	7	29.17
3.	स्वतःसाठी		0.00
4.	आर्थिक फायदा	2	8.33
5.	वैयक्तिक वाढ	4	16.67



निष्कर्ष -

येथे निष्कर्ष व शिफारशी यांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे . या निष्कर्ष व शिफारशी ह्या रत्नागिरी जल्ह्यातील एकूण २८ महाविद्यालयातील ग्रंठ्पालाना प्रश्नावली देऊन त्यातून मिळालेल्या २४ २४ प्रश्नावालींचा अभ्यास करून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे . यामध्ये ग्रंथपालांन्याकार्यसामाधनाचा अभ्यास करण्यात आला

आहे. त्यांच्या सेवेचा कालावधी किती आहे . वैवाहिक जीवन, वेतनश्रेणी त्यांना मिळत असलेल्या सुट्ट्या , निवृत्ती वेतन व इतर लाभ , ग्रंथालयात काम करत असताना त्यांच्या क्षमतेचा पुरेपूर वापर होतो का ? या व्यवसायात विकास करण्याच्या संधी , कामाचे तास इत्यादी सर्व बाबीचा बारकाईने अभ्यास केला आहे व त्यावरून निष्कर्ष व शिफारशी मांडलेल्या आहेत .

1 रत्नागिरी जिल्ह्यातील अभ्यासासाठी घेतलेल्या महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रतिसाद मिळालेल्या एकूण २४ महाविद्यालायापैकी एकूण १० महाविद्यालये अनुदानित आहेत.

2 ग्रंथपालांच्या शैक्षणिक पात्रता व सेवेच्या स्वरूपाचा विचार करताना मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करताना एकूण १० महाविद्यालयाच्या ग्रंथपालानी नेट/सेट किवा पी एच डी.अहर्ता धारण केलेली आहे. उर्वरित १४ महाविद्यालयाच्या ग्रंथपालानी एम.लिब. आय एस सी . एवढीच शैक्षणिक पात्रता ग्रहण केलेली आहे . तसेच फक्त १० महाविद्यालयीन ग्रंथपाल हे कायम सेवेत आहेत व इतर १४ हंगामी स्वरुपात आहेत .

3 ग्रंथपालांच्या सेवेमध्ये ५४ % ग्रंथपाल हे ६ ते १० वर्ष सेवा भूषवित आहेत व ११ ते १५ वर्षावरील सेवेत असलेल्या ग्रंथपालाची संख्या ८ % आहे.

4 ग्रंथपालांच्या वेतनाचा विचार केलातर ३००० रु ते १२००० रु वेतन घेणाऱ्या ग्रंथपालाची संख्या हि ५९ % आहे व ७५००० रु पेक्षा जास्त पगार घेणाऱ्या ग्रंथपालाची सख्या प्रत्यकी ४% आहे.

5 ग्रंथपाला च्या वैवाहिक जीवनाचा विचार करता मिळालेल्या माहिती वरून असे दिसून येते कि, ७९ % ग्रंथपाल हे अविवाहित आहे तसेच ७१ % ग्रंथपाल हे एकत्र कुटुंब पद्धती मध्ये आहेत व २९ % हे विभक्त कुटुंबाशी संबंधित आहेत.

6 ग्रंथपालाची वय परत्वे विश्लेषण केले असता ३५ ते ४५ वयोगटातील ग्रंथपाला ची संख्या ६६.६७ % आहे व २५ ते ३५ वयाच्या ग्रंथपाला ची संख्या ८ % एवढीच आहे .

7 ग्रंथपाल पदासाठी मिळणाऱ्या सुट्ट्या या प्रश्नाचे विश्लेषण केले असता १६.६६ % ग्रंथपाल समाधानी आहेत व ८३.३३ % ग्रंथपाल असमाधानी आहेत .

8 निवृत्ती वेतन व अनुषंगिक लाभा संदर्भात फक्त १७ % ग्रंथपाल हे समाधानी आहेत तर ८३ % ग्रंथपाल हे अतिशय असमाधानी आहेत . एकूण ग्रंथपालापैकी बहुसंख्य ग्रंथपाल हे २००५ नंतर सेवेत असल्यामुळे त्यांना नवीन पेंशन योजना लागू आहे त्यामुळे ते अतिशय असमाधानी आहेत.

अनुदानित महाविद्यालयातील ग्रंथपाल हे कायम स्वरूपी नोकरीत असल्यामुळे ते समाधानी आहेत.

समारोप-

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथपालाचे कार्य समाधान या अभ्यासात असे दिसून आले कि काही गोष्टींच्या बाबतीत कर्मचारी समाधानी आहेत . काही बाबतीत मात्र असमाधानी आहेत . ग्रंथपालानी सेट/नेट किवा पी.एच.डी. धारण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे . ग्रंथालय माहितीशास्त्र या विषयाच्या पी.एच. डी. च्या जागा ह्या अत्यल्प असतात व गाईड ची उपलब्धता हि कमी आहे ती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे . तसेच २५ ते ३५ वयअसलेले तरुण या व्यवसायाकडे वळताना दिसत नाहीत . तरी या कोर्स ची उपयुक्तता समाजापर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. हे पद बिगर सुट्टीचे शैक्षणिक पद असल्यामुळे ग्रंथपाला ना कायम महाविद्यालयामध्ये हजार राहावे लागते. सुट्टी घेताना त्यांचा कार्यभार कोणी घेऊ शकत नाही . त्यामुळे सुट्ट्या च्या बाबतीत समाधनी नाहीत . म्हणूनच ग्रंथापालाना प्रध्यापाकाप्रमाणे सुट्ट्या देणे गरजेचे आहे. असे सर्व निरीक्षण प्रस्तुत शोध्निबंधातून दिसून आले आहे .

संदर्भ -

1. पंडित, र.वि., औध्योगिक मानसशास्त्र संघटनात्मक व उपभोक्ता वर्तन, नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन, २०१२.
2. निकोसे, सत्यप्रकाश , आधुनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन , नागपूर,प्रज्ञा प्रकाशन, २००७ .
3. बुवा, जी.ए. ग्रंथालय व माहितीशास्त्र व्याव्स्थापनाचे नवे प्रवाह , बांदा: सी प्रकाशन ,
4. Ramkrishnaiah, D , Job Satisfaction of College Teachers , New Delhi, Discovery Publishing House, 2010.
5. Kumar, P.S.G, Management of Library & Information Centers, Nagapur B.R.Publishing , 2002
6. Kuffalikar,C.R. SWOT A keyto Accreditation, Wardha- Challenging Role of Academic Libraries in Higher Education , 2003 .
7. Krishna , Murthy, R,Library management, New Delhi , Commonwealth Pub,1997.
8. Faruqui,Khalid F , Planning Budget in Libraries ; New Delhi: Anmol Publication, 1997